महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०८ वा | दिनांक : २२/०१/२०२५ | वार : बुधवार

## कर्नाटक हायकोर्टाचे जज म्हणाले- संविधान बनवण्यात ब्राह्मणांचे योगदान

**बेंगळुरू :** कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्णा एस दीक्षित यांनी ब्राह्मण परिषदेत सांगितले की, संविधान निर्मितीमध्ये ब्राह्मणांचे महत्त्वाचे योगदान आहे. ते म्हणाले की, संविधान मसुदा समितीच्या ७ सदस्यांपैकी ३ ब्राह्मण होते.

न्यायमूर्ती दीक्षित म्हणाले की, राज्यघटनेचे निर्माते डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी भांडारकर इन्स्टिट्यूटमध्ये सांगितले होते की, बीएन राव यांनी संविधानाचा मसुदा तयार केला नसता तर तो तयार होण्यासाठी आणखी २५ वर्षे लागली असती.

अखिल कर्नाटक ब्राह्मण महासभेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त १८-१९ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'विश्वामित्र' या दोन दिवसीय ब्राह्मण परिषदेत न्यायमूर्ती दीक्षित सहभागी झाले होते.

ते म्हणाले की वेदांचे वर्गीकरण करणारे वेद व्यास हे मच्छीमाराचे पुत्र होते आणि रामायण लिहिणारे महर्षि वाल्मिकी हे अनुसूचित जातीचे होते किंवा अनुसूचित जमातीचे होते. ते म्हणाले- आपण (ब्राह्मणांनी) त्यांच्याकडे तुच्छतेने पाहिले आहे का? आपण शतकानुशतके प्रभू रामाची उपासना करत आलो आहोत आणि त्यांची मूल्ये संविधानात समाविष्ट केली आहेत.

न्यायमूर्ती दीक्षित यांनी ब्राह्मणेतर राष्ट्रवादी चळवळींशी असलेल्या त्यांच्या भूतकाळातील सहवासाचा उल्लेख केला आणि ते म्हणाले की, न्यायाधीश बनल्यानंतर त्यांने स्वतःला इतर सर्व कामांपासून दूर केले आहे आणि ते न्यायालयीन चौकटीत बोलत आहेत.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले न्यायमूर्ती व्ही श्रीशानंद यांनी अशा समारंभांच्या गरजेचा बचाव केला आणि व्यापक सामाजिक-आर्थिक संघर्षांदरम्यान परिषदेच्या भव्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या टीकाकारांना उत्तर दिले.

ते म्हणाले- जेव्हा लोक अन्न आणि शिक्षणासाठी झगडत आहेत अशा वेळी इतक्या मोठ्या कार्यक्रमांची गरज काय असा प्रश्न अनेकांना पडतो. पण समाजाला एकत्र आणण्यासाठी आणि संबंधित समस्यांवर चर्चा करण्यासाठी या घटना आवश्यक आहेत. असे कार्यक्रम का आयोजित करू नयेत?

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शेखर कुमार यादव ८ डिसेंबर २०२४ रोजी प्रयागराज येथे विहिंपच्या कायदेशीर कक्षाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. ते म्हणाले होते- हा भारत आहे आणि येथे राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार हा देश चालेल, असे म्हणण्यास मला अजिबात संकोच नाही.

ते म्हणाले होते - हा कट्टरपणा योग्य शब्द नाही. पण ते देशासाठी वाईट आहे म्हणून म्हणायला परावृत्त नाही. हे देशाच्या विरोधात धोकादायक आहे. जनतेला भडकावणारे लोक आहेत. देशाची प्रगती होऊ नये असे वाटणारे लोक आहेत. त्यांच्याबाबत सावधगिरी बाळगण्याची गरज आहे.

## राज्य सरकारमधील मंत्र्याचीही चौकशी करा - जरांगे



**जालना :** वाल्मीक कराडसह इतर आरोपींचा नवीन सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे. आवाद कंपनीला खंडणी मागितली, त्या दिवशीचे हे फुटेज असल्याचे म्हटले जात आहे. त्यावर राज्यभरातून प्रतिक्रिया येत आहेत. या सीसीटीव्ही फुटेजवर मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे यांनी नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत. खंडणी आणि खुनातील आरोपी एकच आहेत. आज तो पुरावादेखील समोर आला, असे मनोज जरांगे म्हणाले. राज्य सरकारमधील त्या मंत्र्याचीही पोलिसांनी चौकशी केली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

वाल्मिक कराडने ज्या दिवशी विष्णू चाटेच्या मोबाईलवरुन आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितली होती, त्या दिवशीचे एक सीसीटीव्ही फुटेज हाती आलेले आहे. केज येथील विष्णू चाटेच्या कार्यालयाबाहेरील हे सीसीटीव्ही फुटेज असल्याचे सांगितले जात आहे. या व्हिडीओमध्ये वाल्मिक कराड, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, कृष्णा आंधळे, बालाजी तांदळे यांसह निलंबित पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील दिसत आहेत. खून आणि खंडणीतील आरोपी एकत्रित असल्याचा हा मोठा पुरावा पोलिसांना मिळाला आहे. सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर मनोज जरांगे यांनी उपरोक्त प्रतिक्रिया देत धनंजय मुंडेंवर तोफ डागली आहे.

सीसीटीव्ही मधील सर्व आरोपी पाहून खरंच धक्कादायक आणि चीड येणार आहे. राज्याने अशा गुंडगिरीचा आणि हप्ते वसुलीच्या टोळ्या या अगोदर बघितल्या होत्या. काय वाईट बघायची वेळ या धनंजय मुंडेंच्या टोळीने आणली आहे. आजचा व्हिडिओ तर खूप धक्कादायक आहे. एका जागेवर बसून खंडणी मागायचा आणि खून करायचा कट शिजवण्यात येतो. एक मंत्री संघटित गुन्हेगारीला पाठबळ देतो. खंडणी मागणारे आणि आरोपी हे एकच आहेत, असे मनोज जरांगे म्हणाले.

सीसीटीव्ही मधल्या एकाही आरोपीला सोडू नका, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. खंडणीतला आणि खुनातला एकही आरोपी सुटला तर देशमुख कुटुंबियांवर संकट येऊ शकते. देशमुख कुटुंबियांचा सुद्धा मर्डर करतील, अशी भीतीही जरांगेंनी व्यक्त केली. या सीसीटीव्हीमुळे आता तर सिद्धच झाले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री साहेबांनी विशेष लक्ष देऊन या लोकांना सुटूच दिले नाही पाहिजे, असेही ते म्हणाले. खंडणी मागायला लावणारी वेगळी टीम, खून करायला लावणारी वेगळी टीम आणि हे सर्व करून घेणारा म्होरक्या, अशा तीन टीम या गुन्ह्यात आहेत. खंडणी मागणाऱ्यापेक्षा सामूहिक कट रचणारा सर्वात मोठा गुन्हेगार आहे. हा मुख्य आरोपी झाला पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

यांचे खून करण्याआधीचे फुटेज देखील सापडले आहे. खून झाला तरी हा व्यक्ती तिथेच कुठेतरी केजला म्हणा किंवा इकडे तिकडे आजूबाजूला बसून होता. याचे सुद्धा फुटेज तपास यंत्रणेने बाहेर काढले पाहिजे. खून करणारे आणि खंडणीतील आरोपींची पाठराखण करणारा मुख्य सुत्रधार आहे. याला मुख्य आरोपी करा. आरोपींना इतक्या दिवस गाड्या कुणी पुरवल्या, रहायला घरांची सोय कुणी केली आणि आरोपी कुणाशी संपर्कात होते, याचा शोध लागला पाहिजे. राज्य सरकारमधल्या त्या मंत्र्याचीही पोलिसांनी चौकशी केली पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

## प्रजासत्ताक दिन पूर्वतयारीचा 'विभागीय आयुक्ता' कडून आढावा




**छत्रपती संभाजीनगर :** प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा २६ जानेवारी रोजी सकाळी ९:१५ वाजता देवगिरी मैदान, पोलीस आयुक्त कार्यालय येथे आयोजिण्यात आला आहे. मुख्य ध्वजारोहण समारंभासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज येथे दिले.प्रजासत्ताक दिन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त अरविंद लोखंडे, तहसीलदार अरूण पावडे, नायब तहसीलदार गजानन नांदगावकर यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, माहिती व जनसंपर्क आदीसह विविध कार्यालयांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. श्री. गावडे म्हणाले की, मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. मुख्य शासकीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने कार्यक्रमस्थळी स्वच्छता, कार्यक्रम स्थळी असलेली व्यवस्था, ध्वजाला मानवंदना, पोलीस पथक, बँड पथकाची नियुक्तीसह याबाबतच्या तयारीची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत अशा सूचनाही श्री. गावडे यांनी बैठकीत दिल्या. उपायुक्त लोखंडे यांनी स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पूर्वतयारीबाबत शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत माहिती दिली.यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ जानेवारी २०२५


## जीवनात अशक्य असे काहीच नाही - शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे




**लातूर, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : जीवन सुंदर आहे, ते प्रमाणिकपणाने जगत राहिलो तर गुलाबाच्या पाकळ्याप्रमाणे उमलत जाते. ते पूर्ण उमलल्यानंतर त्याची सुंदरता अधिक दिसते. परंतु खडतर जीवनाचा प्रवास पार केल्याशिवाय हे शक्य नाही. खरंतर जीवनात अशक्य असे काहीच नाही, असे प्रतिपादन लातूरच्या जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी केले. लातूर येथील महालक्ष्मी गर्ल्स हॉस्टेल मध्ये आयोजित रविवारी (ता.१९) रोजी हळदी-कुंकू व नीट परीक्षा मार्गदर्शन या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महालक्ष्मी गर्ल्स हॉस्टेलच्या संचालिका मैथिली कुमार होत्या.

यावेळी जयश्री पवळे, कालिका चिखले, सुमित्रा पाटील, उषा कोराटे, ज्योती भोसले, हर्षदा मॅडम आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, सन १९९५-९६ ला परभणी येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयात शिकताना मी मेरा नाम जोकर मधील राजकपूरची जोकरची भूमिका साकारली होती. अगदी त्यानुसारच मी जीवनाच्या रंगछटा उलगडून दाखविल्या होत्या. आम्ही चार बहिणी व दोन भाऊ, वडिलांना पॅरालिसिस झालेला, घरात अठरा विश्व दारिद्रय, त्यामुळे सर्व जिम्मेदारी माझी आई व आम्हा बहिणीवर. भावांचे शिक्षणही पूर्ण करायचे होते. म्हणून आम्ही मेस चालविली, पंधरा रुपये रोजंदारीवर काम केले, शिवण काम केले, काज-गुंड्या केल्या. आयुष्य आम्हाला हरवण्याचा प्रयत्न करीत होते परंतु आम्ही आयुष्याला हरवायचे ठरविले होते. जीवन ही परीक्षा आहे. माणूस म्हणजे जोकरप्रमाणे आहे. त्याला जीवनात अनेक भूमिका वटवाव्या लागतात. परीक्षा कोणतीही असू दे. त्याला धैर्याने सामोरे गेले तर यश आपलेच असते. सर्व संकटावर मात करत-करत मी जिद्दीने लढत राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे मी खरच १८-१८ तास अभ्यास केला आणि एमपीएससी परीक्षा पास झाले. आज तुमच्यापुढे शिक्षणाधिकारी म्हणून उभी आहे. संकटे सर्वांच्याच वाट्याला येतात. कोणाची दिसतात कोणाची दिसत नाहीत. नीटच्या विद्यार्थिनींना संदेश देताना त्या म्हणाल्या, तुम्हाला विश्वास बसणार नाही मी बॅकबेंचर होते. मला दहावीला ४८ टक्के, बारावीला ५६ टक्के होते. मात्र बी. एड. ला विद्यापीठात पाचवी आले तर एमपीएससी परीक्षेत गोल्ड मेडल मिळविल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुभाष कुमार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. तानाजी भोसले व सहशिक्षक अंगद पवळे तर आभार कविवर्य प्रा. देवदत्त मुंडे यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने महिला व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

फोटो ओळ : लातूर, ता. लातूर येथील महालक्ष्मी हॉस्टेलमध्ये आयोजित कार्यक्रमाप्रसंगी शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांचा सत्कार करताना मैथिली कुमार व महिला भगिनी.

## दिल्ली येथे होणाऱ्या परेडसाठी वैभवी शेंडगे हिची निवड



**उमरगा : (प्रा. सुधीर पंचगल्ले)** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट वैभवी गोपाळ शेंडगे हिची दिल्ली येथे होणाऱ्या २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या RDC संचलन परेडसाठी दिल्ली येथील राजपथावर होणाऱ्या पंतप्रधान रॅलीसाठी ड्रिल मधुन तिची महाराष्ट्राच्या मुलीच्या संघात निवड झाली आहे .प्रत्येक वर्षी होणाऱ्या या संचलनासाठी देशातुन सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशातुन एनसीसी कॅडेटस ड्रिल परेड इतर सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात . या साठी अनेक कठिन चाचण्या, परीक्षा पूर्ण करून ते कॅडेटस इथपर्यंत पोहचतात प्रत्येक कॅडेटसचे एनसीसी मध्ये प्रवेश घेतल्या नंतर सर्वात मोठे उदिष्ठ , स्वप्न याच शिबीराचे असते रात्र -दिवस एक करून हे कॅडेटस याची तयारी करत असतात. हे शिबीर कॅडेटसचे भवितव्य ठरवणारे असते. मौजे कोरेगाववाडी ता. उमरगा जि. धाराशिव येथील छोट्याशा खेडगावातुन कठिन अशा परिस्थितीताला सामोरे जाऊन एका गरीब शेतकऱ्याची मुलीने स्वतःच्या जिद्द ,आत्मविश्वास , कठोर परिश्रम घेऊन हे यश वैभवी शेंडगे या मुलीने पूर्ण करून दाखविले आहे हिचे कौतुक संपुर्ण धाराशिव जिल्हा,उमरगा तालुक्यातुन होत आहे .

वैभवीला ५३ महाराष्ट्र एनसीसी बरालिएन लातूरचे कमान अधिकारी कर्नल वाय बी सिंग त्यांच्या सर्व सैन्यदलातील संघ व कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी मार्गदर्शन केले . या यशा बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा .अमोल भैया मोरे उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे , सर्व संस्थेचे संचालक मंडळातील सदस्यानी तिचे कौतुक व अभिनंदन केले. तसेच शिबीरात सहभागी झाल्या बदल प्राचार्य डॉ संजय अस्वले, उप्राचार्य डॉ विलास इंगळे , डॉ पदमाकर पिटले , प्रा गुंडाबापु मोरे , शैलेश महामुनी, श्री नितीन कोराळे, राजकुमार सोनवणे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी यांच्या वतीने यशिस्वेतेसाठी शुभेच्छा दिल्या.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ जानेवारी २०२५


## डॉ. पंजाबराव देशमुखांनी शैक्षणिक व कृषी कार्यातून सामाजिक क्रांती घडवली - प्रा. डॉ. सतीश मस्के



**सिंधुदुर्ग :** शिक्षण,कृषी व परिवर्तन विचारांच्या माध्यमातून बहुजनांचे परिवर्तन करणारे लोकनेते, विचारवंत, समाज सुधारक, शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून विदर्भातील डॉ.पंजाबराव देशमुख यांना ओळखले जाते. इंग्लंड वरून शिक्षण घेऊन त्या शिक्षणाचा उपयोग सामाजिक कार्यासाठी, बहुजनांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळवून देण्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केला. असे मत मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ . सतीश मस्के यांनी व्याख्याना प्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एल. बी. पवार हे होते. विचारमंचावर पवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय लेपसे, प्रा. व्ही.जी.उगलमुगले, व्याख्यान समन्वयक प्रा. धीरज चन्नेकर, आयक्युएसी चे समन्वयक प्रा. डॉ. संजय खोडके,लोकराज चौधरी आदी उपस्थित होते. शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचलित विज्ञान महाविद्यालय पवनी, जि.भंडारा यांच्या वतीने डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त पिंपळनेर येथील कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात "डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे शैक्षणिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील योगदान" या विषयावर प्रा.डॉ .सतीश मस्के यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना डॉ. सतीश मस्के म्हणाले की,अस्पृश्यांसाठी मंदिर खुले, मोफत शिक्षणाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, कर्ज लवाद कायदा, हिंदू देवस्थान संपत्ती बिल अशी कार्य करून बहुजनांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे काम त्यांनी केले.१९३२ साली शिक्षण संस्था निर्माण करून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार केला. देशातील दुसऱ्या क्रमांकाची शिक्षण संस्था म्हणून डॉ . पंजाबराव देशमुख यांच्या शिवाजी शिक्षण संस्थेला ओळखले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटना समितीत काम करून शेतकरी, ओबीसी समाजासाठीही महत्त्वाचे काम करून आरक्षण मिळवून देण्याचाही प्रयत्न केला. १९५२ मध्ये अमरावती लोकसभेत निवडून आल्यानंतर कृषिमंत्री पद मिळाल्यानंतर शेतकऱ्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी फार प्रयत्न केले. त्यांनी डॉ . बाबासाहेब आंबेडकर,कर्मवीर भाऊराव पाटील, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांच्याबरोबर प्रबोधनाचे आणि समाज उन्नतीचे कार्य केले. अध्यक्षीय समारोप करत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.एल.बी. पवार म्हणाले की, शिवाजी शिक्षण संस्थेत केजी टू पीजी म्हणजे सर्व विद्याशाखांचे शिक्षण दिले जाते. सामाजिक कार्याच्या व शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केले. त्यांच्या संस्थेतील अनेक विद्यार्थी देशाच्या कानाकोपऱ्यात नावलौकिक मिळवताना दिसत आहेत. त्यांच्या विचारांचा जागर सगळीकडे व्हावा म्हणून ही संस्था व्याख्यानाच्या माध्यमातून कार्य करत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. विजय लेपसे यांनी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी शिवाजी शिक्षण संस्थेने केलेल्या कार्याचा आढावा घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयक्युएसी चे समन्वयक प्रा.डॉ. संजय खोडके यांनी केले.आभार प्रा.धीरज चन्नेकर यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा.एम.व्ही.बळसाने,प्रा. डॉ.ए.जी.खरात, प्रा. डॉ.वाय.एम.नांद्रे, प्रा. डॉ. के.एन.वसावे,प्रा.डी.बी. जाधव, प्रा.सी.एन. घरटे, प्रा. वाघ, प्रा. नेरकर, प्रा. वानखेडे, प्रा. तोरवणे, प्रा.गौड,प्रा. बागुल आदी प्राध्यापक व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## भेसळयुक्त अन्नपदार्थ खाल्ल्याने पोट खराब होऊन मानसिक संतुलन बिघडते - प्रा. डॉ.खांडेभराड




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** दैनंदिन जीवनामध्ये अनेक भेसळयुक्त अन्नपदार्थ आपण खात असून त्यामुळे आपले पोट खराब होऊन मानसिक संतुलन बिघडते असे प्रतिपादन जालना च्या जेईएस महाविद्यालया च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबिरात सायगाव (डोंगरगाव) येथे प्रा. डॉ. अमोल खांडेभराड यांनी केले. जेईएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सायगाव (डोंगरगाव) ता. बदनापूर जि.जालना येथे ७ दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ जानेवारी रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात 'अन्नभेसळी मधील ओळख' या विषयावर प्रा. डॉ. अमोल खांडेभराड यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्रा डॉ. सुशांत देशमुख होते व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना डॉ. अमोल खांडेभराड म्हणाले की दैनंदिन जीवनामध्ये दूध तूप, तांदूळ, डाळी, तेल आदी अनेक खाद्यपदार्थांमध्ये भेसळ आपणास पहावयास मिळते. हळद मध्ये ही रंगाचा वापर करून हळद व मिरची पावडर याची विक्री केली जाते. आपल्या आहारामध्ये वेगवेगळ्या तेलांचा आपण वापर केला पाहिजे. सोयाबीनचे तेल शरीरासाठी घातक असल्याचेही डॉ.खांडेभराड यांनी सांगितले. आईस्क्रीम ,नूडल्स याच्या मध्येही भेसळ दिसते , त्यात वनस्पतीही चा वापर केला जातो,त्यामुळे अनेक गंभीर आजार होतात. खव्यामध्ये मैद्याचा वापर करून भेसळ केली जाते. विविध रासायनिक प्रक्रिया करून ही भेसळ आपल्याला ओळखता येते. याचं ज्ञान नागरिकांना अवगत झाल्यास निश्चित भारतीय नागरिकांचे जीवन निरोगी राहील असेही डॉ. खांडेभराड यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्ष समारोप करताना प्रा .डॉ. सुशांत देशमुख म्हणाले की आज समाजामध्ये काही समाजकंटक पैशासाठी भेसळ करत असून यामध्ये मनुष्य जीवनाची हानी होत आहे आपल्या शनिक फायद्यासाठी लोकांचं आरोग्य शी खेळतात त्यामुळे देशाचे नुकसान होते पुढे त्यांचे वाट्याला भेसळयुक्त पदार्थ येतात त्यांचे नुकसान होतं प्रामाणिकपणे काम केल्यास असं होणार नाही असेही डॉ. देशमुख यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ.राजेश सरकटे, प्रा. योगेश लाहामटे, प्राध्यापक किशोर तापडिया आदी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री.भरत अहिरे, श्री गजेंद्र घोडके, श्री.ठोंबरे, श्री विजय सुलाने, श्री. काळे आदीनी विशेष परिश्रम घेतलेत.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ जानेवारी २०२५


# महानगरपालिकेतील शाळेचे वैविध्यपूर्ण स्नेह स्नेहसंमेलन



**छत्रपती संभाजीनगर :** स्नेह संमेलन म्हणजे सादरकर्त्यांच्या कला-गुणांना उजाळा देणारी एक आनंद पर्वणी असते. वर्षातील सुरुवातीच्या जानेवारी महिन्या पासून विविध शाळांमध्ये स्नेहसंमेलनाची धूम सुरु होते. मनपा कें.प्रा. शा.मुकुंदवाडी शाळेमध्ये आज दि. २१ जानेवारी रोजी स्नेह संमेलन उत्साहात झाले. मर्यादित साधन-सामुग्री, संसाधने असूनही स्नेह-संमेलने दर्जेदार होतात हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. हे स्नेहसंमेलन प्रबोधनपर, मनोरंजक आणि अंधश्रद्धा यावर आघात करणारे ठरले. मुकुंदवाडीतील विद्यार्थ्यांचा नाट्याभिनय, नृत्य निपुणता, पदलालित्य आणि कलाविष्कार कौतुकास्पद आहे. या वार्षिक स्नेह संमेलनामध्ये समूह नृत्ये, प्रबोधनपर मुकनाट्य, देशभक्तीपर समूह नृत्ये, मराठी-हिंदी गीतांवरील नृत्ये, यांचा समावेश केला गेला. या स्नेह संमेलनात विद्यार्थी एखादया निष्णात कलावंतां प्रमाणे आपली भूमिका पार पाडत असतात.

भविष्यात या बालकलाकारां मधून उच्च दर्जाचे कलावंत निर्माण होऊ शकतात. गरज आहे ती फक्त त्यांच्यातील कलागुणांना हेरून त्यांना प्रोत्साहन देण्याची. आणि हीच बाब महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक महोदय मा. श्री. जी. श्रीकांत साहेब यांच्या संकल्पनेतील स्मार्ट स्कुल टू बेस्ट स्कुल या उपक्रमांतर्गत शाळेतच अभिनय, संगीत आणि नृत्य क्षेत्रातील विशेष प्रशिक्षण अशा मुलांना दिल्या जात असल्यामुळे त्यांच्यातील कलागुणांचा व्यापक विकास होऊन छत्रपती संभाजीनगर हे शहर सांस्कृतिकदृष्ट्या अधिक नावारूपास येईल.

# अक्षय कुमारने सैफला म्हटले धाडसी

अक्षय कुमार सध्या स्काय फोर्स या चित्रपटामुळे चर्चेत आहे. दरम्यान, एका कार्यक्रमादरम्यान तो त्याचा को-स्टार सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्याबाबत बोलला. अक्षयने सैफला धाडसी संबोधले आणि सैफने ज्या प्रकारे आपल्या कुटुंबाचे रक्षण केले ते शौर्याचे कृत्य असल्याचे सांगितले.

त्याच्या स्काय फोर्स चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान अक्षय कुमार म्हणाला, 'तो सुरक्षित आहे हे खूप छान आहे. तो सुरक्षित असल्याने संपूर्ण इंडस्ट्रीला आनंद झाला आहे. त्याने ज्या प्रकारे आपल्या कुटुंबाचे रक्षण केले ते शौर्याचे कृत्य आहे.

अक्षय कुमार पुढे म्हणाला, 'मी सैफसोबत 'मैं खिलाडी तू अनारी'मध्ये एकत्र काम केले होते. पण आता पुढच्या वेळी चित्रपट बनवला तर त्याचे शीर्षक 'दो खिलाडी' असे असेल.

अक्षय कुमार आणि सैफ अली खान १९९४ मध्ये आलेल्या 'मैं खिलाडी तू अनाडी' या चित्रपटात एकत्र दिसले होते. हा चित्रपट हिट ठरला. याशिवाय दोघांनी 'टशन' चित्रपटातही एकत्र काम केले होते.

१५ जानेवारीच्या रात्री एका आरोपीने सैफ अली खानवर त्याच्या वांद्रे येथील घरात चाकूने हल्ला केला. यावेळी त्याच्या मानेवर, पाठीवर, हातावर, डोक्यावर सहा ठिकाणी वार करण्यात आले. रात्रीच त्याला रुग्णालयात नेण्यात आले.

लीलावती रुग्णालयाच्या डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, सैफच्या पाठीच्या कण्यामध्ये चाकूचा तुकडा अडकला होता आणि त्यातून द्रवही गळत होता. तो शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आला. डॉक्टरांनी सांगितले की अभिनेत्याच्या मणक्यामध्ये चाकू २ मि.मी. खोलवर रुतला होता. तो आणखी खोल असता तर पाठीच्या कण्याला मोठे नुकसान होऊ शकले असते. मात्र, आता सैफ धोक्याबाहेर असून लवकरच त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळू शकतो.

# स्वामित्व योजनेअंतर्गत दिलेले मालमत्ता कार्ड कर्जासाठी वैध दस्ताऐवज- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२०(जिमाका) – स्वामित्व योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या मालमत्ता कार्डावर बँका संबंधित मालकास अर्थसहाय्य देता येते, त्यातून ग्रामिण भागातील लोक आपल्या व्यवसायासाठी कर्ज घेऊ शकतात, याबाबत बँकांनी अंमलबजावणी करावी, मालमत्ता कार्ड हे वैध दस्ताऐवज आहे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज बँक अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज जिल्हा सल्लागार व समन्वय समितीची बैठक पार पडली. रिजर्व बँकेचे अमितकुमार मिश्रा, बँक ऑफ महाराष्ट्र चे क्षेत्रिय प्रबंधक विवेक नाचणे, नाबार्डचे विभागीय अधिकारी सुरेश पटवेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, महाराष्ट्र ग्रामिण बँकेचे मनोहर वाडकर, सज्जय जहीर हुसेन, ओबीसी महामंडळाचे व्यवस्थापक जगन्नाथ राठोड, माविमचे समन्वयक चंदनसिंग राठोड, दुग्धविकास अधिकारी मनिषा हराळ मोरे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक समाधान सुर्यवंशी, वसंतराव नाईक महामंडळाचे व्यवस्थापक वैभव घोडके तसेच सर्व बँकांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने सैनिक कल्याण निधीसाठी ११ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच महिला बचत गटांतून यशस्वी उद्योजिका कालिंदी जाधव यांनाही सन्मानित करण्यात आले. बैठकीत सर्व क्षेत्रनिहाय बँकांमार्फत होत असलेल्या अर्थसहाय्याचा आढावा घेण्यात आला. पिक कर्ज योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, जीवनोन्नती अभियान, कृषी अर्थसहाय्य, पशुपालन व दुग्ध व्यवसाय अर्थ सहाय्य, प्रधानमंत्री विश्वकर्मा अशा विविध योजनांतर्गत अर्थसहाय्याबाबत आढावा घेण्यात आला.

स्वरोजगार व उद्योग करु इच्छिणाऱ्या अर्जदारास बँकांनी योग्य ते सहकार्य करुन अर्थसहाय्य उपलब्ध करुन द्यावे. आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घ्यावी. शेती, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, पशुपालन अशा विविध क्षेत्रात अर्थसहाय्य केल्यास त्यातून चांगल्या प्रकारे ग्रामिण भागात रोजगार निर्मितीला चालना मिळू शकते,असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. बँक अधिकारी कर्मचाऱ्यांच्याही अडीअडचणी त्यांनी ऐकून घेतल्या. जिल्ह्यातील बँक अधिकारी-कर्मचारी यांचे विविध योजनांसंदर्भात एक शिबिर घेण्यात यावे व त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे,असेही त्यांनी सांगितले.जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी सादरीकरण केले.

# देवेंद्र फडणवीस सरकार शापित - नीलेश लंके



**अहमदनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार शापित असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके यांनी केला आहे. नीलेश लंके यांनी हे मत आपले नव्हे तर महायुती सरकारच्या एका बड्या मंत्र्याचे असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात हा बडा नेता कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महायुती सरकारने शनिवारी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. त्यात नाशिकचे पालकमंत्रीपद भाजप नेते गिरीश महाजन यांच्याकडे सोपवण्यात आले, तर रायगडचे पालकत्व महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने या दोन्ही जिल्ह्यांवर दावा सांगितला. त्यांच्या पक्षाच्या दादा भुसे यांनी नाशिकवर व भरत गोगावले यांनी रायगडवर दावा सांगितला. त्यानंतर एकनाथ शिंदे नाराज होऊन साताऱ्याच्या आपल्या दरे या गावी निघून गेले.

त्यानंतर राज्य सरकारने नाशिक व रायगडच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती दिली. या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी उपरोक्त दावा केला आहे. हे सरकारच शापित आहे. महायुतीमधील एका बड्या मंत्र्याने पत्रकारांशी खासगीत बोलताना हे विधान केले आहे. या सरकारने ईव्हीएमच्या जोरावर निवडून आलेल्या लोकांना पाडण्याचे व पडलेल्या लोकांना निवडून आणण्याचे काम केले आहे. पण ईव्हीएमच्या जोरावर निवडून आलेले सरकार केव्हाच टिकत नसते, असे नीलेश लंके यांनी म्हटले आहे.